**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१२**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- १ शुक्रवार दिनांक ३०/११/२००७

ठराव क्रमांक- १ शुक्रवार दिनांक ३०/११/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेंच मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती ,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणुक घेणे) नियम २००७ अन्वयेचे तरतुदी नुसार मा.स्थायी समिती सभापती पदावर सभापतींची निवड करणे.

**ठराव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेंच मुंबई प्रांतिक महानगरपिालका (स्थायी समिती ,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणुक घेणे) नियम २००७ अन्वयेचे तरतुदी नुसार मा.स्थायी समिती सदस्यां मधून स्थायी समिती सभापती पदावर सभापतींची निवड करणे कामी बोलविण्यांत आल्या प्रमाणे मा.स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ३०/११/२००७ रोजी सकाळी ११=०० वाजता महानगरपालिका सभागृहा मध्यें भरली असतां मा.महापौर श्री कोतकर संदीप भानुदास एकनाथ हे पिठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होते तसेच खालील प्रमाणे मा. स्थायी समिती सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | मा.सदस्यांचे नांव |
|---|---|
| १ | मा.श्री. कोतकर भानुदास एकनाथ |
| २ | मा.सौ.कांबळे मंगला राजकुमार |
| ३ | मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश |
| ४ | मा.सौ. गुरुड राधा रमेश |
| ५ | मा.श्री घुले अविनाश हरिभाऊ |
| ६ | मा.श्री.तिवारी सुरेश रतनप्रसाद |
| ७ | मा.सौ. दिघे विमल रामचंद्र |
| ८ | मा.सौ.पवार संध्या बाळासाहेब |

| | |
|---|---|
| ९ | मा.श्रीमती. बोरुडे इंदुबाई परशुराम |
| १० | मा.सौ. मुदगल सुनिता दत्तात्रय |
| ११ | मा.श्री.मैड सतिष बबनराव |
| १२ | मा.सौ. मोरे सविता दिलीप |
| १३ | मा.श्री.शेख आरिफ शेख रफियोद्यीन |
| १४ | मा.श्री. शिंदे दशरथ बाबु |
| १५ | मा.सौ.शेंडगे रोहीणी संजय |

सभेच्या कामकाजास सकाळी ११.०० वाजता सुरूवात करण्यांत आली. सभेचे सुरूवातीस मा.स्थायी समिती सभापती पदाचे निवडणुकीची कार्यक्रम पत्रिका सभे मध्ये वाचून दाखविण्यांत आली.

सकाळी ११.१५ ते ११.३० वाजे पर्यत मा.स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्र मा. पिठासीन अधिकारी यांचे कडेस सादर करणे करिता वेळ देण्यांत आली.

१. मा.श्री घुले अविनाश हरिभाऊ
सुचक - मा.श्री मैड सतिष बबनराव
अनुमोदक - शिंदे दशरथ बाबु

२. मा.श्री घुले अविनाश हरिभाऊ
सुचक - मा.श्री कोतकर भानुदास एकनाथ
अनुमोदक - मा.श्री शेख आरिफ शेख रफिउद्यीन

३. मा.श्री घुले अविनाश हरिभाऊ
सुचक - मा.सौ.दिघे विमल रामचंद्र
अनुमोदक - मा.सौ.खरपुडे जयश्री सुरेश

४. मा.श्री घुले अविनाश हरिभाऊ
सुचक - मा.सौ.मोरे सविता दिलीप
अनुमोदक - मा.सौ.कांबळे मंगला राजकुमार

५. मा.श्री तिवारी सुरेश रतनप्रसाद
सुचक - मा.सौ.गुरूड राधा रमेश
अनुमोदक - मा.सौ.भागानगरे मनिषा प्रकाश

६ मा.श्रीमती बोरूडे इंदुबाई परशुराम
सुचक - मा.सौ.मुदगल सुनिता दत्तात्रय
अनुमोदक - मा.सौ.शेंडगे रोहिणी संजय

उपरोक्त आलेल्या सहाही नामनिर्देशन पत्राची सकाळी ११.३० ते ११.४५ या वेळात छाननी केली असतां तीनही उमेदवारांचे सहाही नामनिर्देशन पत्र विधीग्राहय असल्याने ते स्विकारण्यांत आल्याचे पिठासीन अधिकारी मा.महापौर साहेब यांनी घोषित केले.

त्या नंतर पिठासन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी सकाळी ११.४५ ते दुपारी १२.०० वाजे पर्यत मुदत देण्यांत आली. उपरोक्त वेळेमध्ये मा.श्री तिवारी सुरेश रतनप्रसाद यांनी उमेदवारी माघारी घेतल्याने व दोन उमेदवार शिल्लक राहील्याने बाराखडीचे वर्गमाले नुसार मत पत्रिकेवर प्रथम क्रमांकावर मा.श्री घुले अविनाश हरिभाऊ व द्वितीय क्रमांकावर मा.श्रीमती बोरूडे इंदूबाई परशुराम या प्रमाणे नावे असतील मा.सदस्यांनी आपले मत हात उंच करून उभारून द्यावयाचे असून ज्यांना जास्त मते पडतील ते निवडून आल्याचे जाहीर करण्यांत येईल. व दोनही उमेदवारांना सम समान मते पडल्यास त्यांच्या नावाच्या चिठ्ठया टाकून सभापती निवडीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. अशा प्रमाणे निवडणुक प्रक्रिये बाबत मा.पिठासीन अधिकारी यांनी माहिती दिली.

मतदान प्रक्रिया दुपारी १२.०० वाजता सुरू केले नंतर मा.श्री घुले अविनाश हरीभाऊ यांचे नाव पुकरण्यात आले असता त्यांचे बाजूने १. मा.श्री घुले अविनाश हरीभाउ २. मा.श्री कोतकर भानुदास एकनाथ ३. मा.श्री मैड सतिष बबनराव ४. मा.श्री शिंदे दशरथ बाबु ५. मा.सौ.खरपुडे जयश्री सुरेश ६. मा.सौ.मोरे सविता दिलीप ७. मा.सौ. कांबळे मंगला राजकुमार ८. मा.सौ. दिघे विमल रामचंद्र ९. मा.सौ.पवार संध्या बाळासाहेब १०.मा.श्री शेख आरिफ शेख रफिउद्यीन यांनी आपले मत हात उभारून मत दिले.त्यानंतर मा.श्रीमती बोरूडे इंदुबाई परशुराम यांचे नांव पुकारण्यांत आले असता त्यांचे बाजूने १. मा.श्रीमती बोरूडे इंदुबाई परशुराम २. मा.श्री तिवारी सुरेश रतनप्रसाद ३. मा.सौ. गुरूड राधा रमेश ४. मा.सौ.मुदगल सुनिता दत्तात्रय ५. मा.सौ.शेंडगे रोहिणी संजय यांनी आपले मत हात उभारून मत दिले तसेंच मा.सौ.भागानगरे मनिषा प्रकाश सदस्या स्थायी समिती हया गैरहजर होत्या.

या प्रमाणे मतदान घेण्यांत आले असता मा.श्री घुले अविनाश हरीभाऊ यांना दहा व मा.श्रीमती बोरूडे इंदुबाई परशुराम यांना पाच मते मिळाली मा.श्रीमती बोरूडे इंदुबाई परशुराम यांचे पेक्षा मा.श्री घुले अविनाश हरीभाऊ यांना पाच मते जादा मिळाली असल्याने पिठासीन अधिकारी यांनी मा.श्री घुले अविनाश हरीभाउ यांची स्थायी समिती सभापदी पदी निवड झाल्याचे जाहीर केले.

सही /-
पिठासीन अधिकारी तथा महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.